# विदर्भाच्या मराठी गझलेतील आंबेडकरवादी जाणीव

**प्रा. संजय एस. पोहरे**
मराठी विभाग
श्री शिवाजी कला , वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला.

★★★

**प्रस्तावना** - सुरेश भटांनी गझल हा सशक्त काव्य प्रकार तंत्र शुद्ध आकृती बंधासह मराठी कवितेमध्ये आणून मराठी कविता समृद्ध केली. गझलेला कोणत्याही विशिष्ट आशय विषयाचे बंधन नसावे, जे जे चांगले आहे ते ते गझलेमध्ये यायला पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. गझल म्हणजे प्रेमाची कविता है समीकरण बदलून त्यांनी गझलेमध्ये प्रेमासह सामाजिक विषय, राजकीय, आत्मचिंतन आदी जाणिवेने गझल लेखन केले आहे. सुरेश भटांनंतर गझलेचा परिघ अधिक व्यापक होत गेला आहे. सुरेश भटांनी मराठी गझलेला जो मान-सन्मान प्राप्त करून दिला तो पुढील चार ते पाच दशकांपासून उंचावत जाताना दिसतो आहे. सुरेश भटांनंतर मराठी गझलेतून कृषी विषयक जाणिवेची गझल, स्त्री विषयक जाणिवेची गझल, जागतिकीकरणाची गझल सुरेश भटांच्या पुढच्या काळाचा टप्पा आहेत. पण सामाजिक जाणीवेची गझल जास्त लोकप्रिय आणि जनमानसाच्या मनाचा ठाव घेणारी ठरली. त्या पुढचा महत्वाचा टप्पा म्हणून आंबेडकरवादी गझलेकडे पाहावे लागेल. आंबेडकरवादी जाणिवेची गझल ही मोट्याप्रमाणात लिहिली जात आहे. बहुतांश मराठी गझलकारांचे प्रेरणास्थान सहाजिकच सुरेश भट हे होत. त्याला दलित गझलकारही अपवाद नाहीत रामदास कुहिटे, (वर्धा), हृदय (बंडू) चक्रधर (नागपूर) हे काफला (१९९०) ह्या पहिल्या प्रातिनिधिक मराठी गझल संग्रहातील दलित गझलकार सुरेश भटांचे ऋण मान्य करतात.

सुरेश भटांनंतर लिहिली गेलेली आंबेडकरवादी मराठी गझल रचनातंत्र आणि आकृतीबंधाच्या संदर्भात सुरेश भटांचा प्रभाव दिसून येतो. तर आशय अभिव्यक्तीच्या अंगाने वामनदादा कर्डकच आंबेडकरीवादी गझलेचे आद्यप्रणेते वा आंबेडकरी आद्य गझलकार ठरतात, यात शंका नाही. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार तत्वज्ञानाचे आणि वैश्विक मूल्य दर्शक बुढाच्या धम्माचे मानवतावादी तत्वज्ञान आहे. वामनदादा कर्डक आणि आंबेडकरी चळवळ हे समीकरण सर्वज्ञात आहे. आंबेडकरवादी आशय, विषय घेऊन गझल लिहिणारे वामनदादा कर्डक आंबेडकरवादी गझलेचे आयप्रणेते ठरतात. यामध्ये कोणतीही विसंगती नसून, सुसंगतीच आहे. भारतीय संविधानाच्या क्षितिजातून आंबेडकरीवादी साहित्याचा उगम झाला आणि महाकवी वामनदादा कर्डकांच्या लेखणीतून आंबेडकरवादी गझल जन्माला आली. आंबेडकरवादी गझलकार म्हणून भाऊ पंचभाई, हृदय चक्रधर, प्रमोद बाळके, फकीरा मोरे, नीलकांत ढोले, ल. स. रोकडे, सुदाम सोनुले, सिद्धार्थ भगत, गौरवकुमार आठवले, सुखदेव ढाणके, अनंत भीमनवार, रमेश बुरबुरे, प्रकाश मोरे, विनोद बुरबुरे, प्रल्हाद सोनवणे, अमोल शिरसाट, मंगेश गजभिये, मिलिंद हिवराळे, संदीप वाकोडे, अविनाश येलकर, प्रवीण हटकर, रवी चापके आदी गझलकारांचा उल्लेख करता येईल. जुन्या पिढीतील दलित कवींची गझल तंत्र शुद्धतेत कच्ची आहे, तर नव्या पिढीतील दलित कवींची गझल तंत्रशुद्धतेच्या बाबतीत बऱ्यापैकी समाधान देणारी आहे. असे म्हटले जाते की, कोणत्याही काळात नवीन पिढी ही आधीच्या पिढीच्या एक पाऊल पुढे असते. आधीच्या गझलकारांनी आकृतिबंधापेक्षा आशयालाच अधिक महत्व दिले होते. तर आज नव्या पिढीने आशयासोबत आकृतिबंधावरही आपले महारथ मिळवलेले आहे.

**आंबेडकरवादी गझल** - आंबेडकरवादी गझल डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार प्रेरणेतून जन्म आलेली आहे. सुरेश भटांनाही आंबेडकरवादी गझलेला जवळचे असलेले समाजवादाचे तत्वज्ञान महत्वाचे वाटत आलेले होते. माझे भांडण प्रवृत्तीशी आहे. ज्या वर्गाची सुखे-समृद्धी इतरांच्या दु:खावर अवलंबून असतात. ज्या वर्गाचा मोठेपणा इतरांच्या तथाकथित लहानपणावर अवलंबून असतो. ज्या गर्वाची सांस्कृतिक श्रेष्ठता इतरांच्या वंचितपणावर अवलंबून असते, त्या वर्गाविषयी माझ्या मनात घृणा आणि द्वेष आहे. निश्चितपणे तिरस्कार आहे. आधुनिक कालखंडात समाजवाद म्हणजे शोषण करणाऱ्या भांडवली व्यवस्थेतून सर्वसामान्य कामगार, कष्टकरी जनतेची सुटका व्हावी आणि स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांवर आधारित लोकशाही व्यवस्था वृढमूल व्हावी. हेच आजच्या आंबेडकरवादी गझलेचे उद्दिष्ट आहेत. आंबेडकरवादी गझलेची संकल्पना वृढमूल करणारे गझलकार, गझल समीक्षक प्रमोद वाळके, युगंधर. आंबेडकरवादी गझलेविषयी भाष्य करताना असे म्हणतात की, ''आंबेडकरवाद म्हणजे जीवनाचे सौंदर्यशास्त्र या सौंदर्यशास्त्राची जातीयता, धर्मनिरपेक्षता, बुद्धिप्रामाण्यवाद हे उपांगे आहेत. लोकशाही समाजवादाची प्रस्थापना करणे, संविधान संस्कृती रुजविणे, सांप्रदायिक शक्तींना थांबविण्यासाठी शर्थीने प्रयत्न करणे, इहवादाच्या अधिष्ठानावर स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाचे दीपस्तंभ उभे करणे, ही त्याची उद्दिष्टये आहेत. या उद्दिष्टांचे अनुगामित्व पत्करणाऱ्या गझलकारालाच आंबेडकरवादी गझलकार म्हणणे संयुक्तिक ठरेल. तर आंबेडकरवादी गझल म्हणजे काय? सांगताना डॉ. यशवंत मनोहर म्हणतात, आंबेडकरवादी गझल म्हणजे मूल्यसंघर्षापोटी जन्माला येणारी विचागझल आहे. विषमतातीत जीवनासाठी जगभर चाललेल्या युद्धात ती सैनिक म्हणून सहभागी होते. शेरातील एका चरणाच्या हातात बाबासाहेबांचा वैज्ञानिक समाजवाद असतो आणि चरणाच्या दुसऱ्या हातात बाबासाहेबांचे एकूणच पुनर्रचनाशील तत्वज्ञान असते. या तत्वज्ञानाच्या बोधीवृक्षातून गझलेतील संवेदनांची आणि भावनांची नक्षत्रे उगवतात.श्श आंबेडकरवाद म्हणजे काय ते काही व्याख्येवरून समजून घेण्याचा प्रयत्न करता येईल

आंबेडकरी कविता दु:खाच्या कोषातून दु:खाबाहेर येणारी आणि मानवी सुखाच्या विश्व घटनेला कवटाळणारी कविता आहे. या कवितेला जन्म देणाऱ्या प्रतिभेचे दिशाकोनच निराळे आहेत, जे मन या कवितेतून बोलते आहे ते मन आंबेडकर मन आहे. यशवंत मनोहर आंबेडकरी कविता आंबेडकरी चळवळीची निर्मिती आहे. नव- सर्जक जाणिवांमधून उभा झालेला हा सांस्कृतिक विद्रोह अमानुष वेदनांना मानवी संवेदनेशी झालेल्या संयोगाची फलश्रुती आहे. ही संवेदना आंबेडकरी संस्कारांनी संस्कारीत झालेली असून, या संवेदनेशी ज्याचा स्पर्श

झाला त्याच्या उरा ओठांतून बाहेर पडणारा स्वर हा क्रांतीचे चिरंतन गीत होणार हे निश्चितश्श प्रा. सतेश्वर मोरे वरील आंबेडकरवादी भाष्यावरून आणि व्याख्येवरून असे म्हणता येईल की, अमानवीय, अवैज्ञानिक आणि विषमतावादी सामाजिक व्यवस्थेपासून दु:खी मानवाची मुक्ती करून स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या आदर्श मूल्यांवर मानवा-मानवातील भेद संपुष्टात आणणारी मानवतावादी विचारधारा ज्या आशय लेखनामध्ये ओतप्रोत भरलेली असते. त्या कवितेला या गझलेला आंबेडकरवादी असे म्हणता येईल. त्यामुळे गझल म्हणजे आंबेडकरी कविताच आहे. फरक तो एवढाच की, आंबेडकरी कविता मुक्तछंदात व्यक्त होते. तर गझल तिच्या विशिष्ट आकृतिबंधात लिहिली जाते. परंतु आंबेडकरी विचारांची प्रेरणा दोन्ही ठिकाणी सारखीच प्रवाहित असते. आंबेडकरवादांची मूल्ये ही विशिष्ट जात, धर्म, पंथ वा देशांपर्यंत मर्यादित नाहीत तर ते वैश्विक नाते निर्माण करणारे आहेत.

कर तू बंद कवाडे मज पर्वा नाही
मजसाठी तर सारे जग बाकी आहे
कायद्याचा प्रश्न नाही प्रश्न आहे वागण्याचा
कायद्याने कायद्याची रोज होते पायमल्ली.

जागतिकीकरणाच्या बदलत्या काळातही अभिजनवादी धर्ममार्तंड कोणत्याही बदलाचे वारे आपल्याला लागू देण्यास तयार नाहीत. परिवर्तन स्वीकारण्यास तयार नाहीत. कारण इतरांच्या शोषणांवरच त्यांच्या श्रेष्ठत्वाचा डोलारा उभा आहे. हे सर्व कुभांड माहिती असल्यामुळेच गझलकार त्याच्या बंद दाराला घाबरत नाही. किंवा त्याला पूर्णत माहिती आहे की, या अमानवीय व्यवस्थेला व्यवस्थित करण्यासाठ्ठी कितीही कायद्याचे बंधन घातले तरी हे त्यातून पळवाट काढतील. कारण झोपलेल्याला जागे करता येते पण झोपेचे सोंग घेणाऱ्याला जागे करता येत नाही. या म्हणीप्रमाणे कायदे आपल्या नैतिकतेला जागृत करण्यासाठी आहेत. नाहीतर अधिकारांचा गैरफायदा घेतला जात आहे. अशा प्रवृत्तीसमोर आपले जीवन स्वाभीमानानेच जगले पाहिजे, अशी शिकवणच आंबेडकरवादी गझलेतून मिळते.

खुर्ची समोर कोण्या हलवू नकोस शेपूट
बापापरीच निर्भीड तूव्हावास वाघ मित्राश्श
ष्वाघ होऊनी जगणे आता शिकून घे तू
कुणाकुणाची कुठवर होते शिकार मित्रा

कोणत्याही ठिकाणी काम करताना निर्भीड राहणे, वाघासारखे राहणे म्हणजे आपल्या कामामध्ये चोख राहण्याचा सल्लाच कवी देतात. डॉ. आंबेडकरांनी सांगितलेले त्यांचा शब्द आंबेडकरी समाजासाठी लेखकांसाठी प्राणवायू झालेले आहेत. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, जे तो प्राषण करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. या शब्दात शिक्षणाचे महत्व अज्ञान समाजामध्ये चेतना निर्माण करणारे ठरले आणि डॉ. आंबेडकर म्हणायचे, लक्षात ठेवा शेळ्या-मेंढ्यांची शिकार कोणीही करेल पण वाघाची नाही. म्हणून वाघांसारखे जगा. शंभर वर्षे शेळी म्हणून जगण्यापेक्षा एक दिवस वाघ बनून जगा. या सर्व संदेशामागचा उद्देश मागासलेल्या समाजामध्ये जाणीव जागृती निर्माण करण्याचा होता. त्याच जाणिवेतून शिकून पुढे आलेली पिढी लिहिती झाली. त्याच पिढीचा आदर्श घेत भटोत्तर आंबेडकरी गझलकार मार्गक्रमण करताना दिसताहेत.

शेळीसारखा वागलास तू वाघासारखा वाग मराठा मराठा समाज हा मुख्य शेतकरी समाज आहे. शेतीची अवस्था बिकट होत चालली आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे लक्ष दिले जात नाहीत. उलट त्यांना जाती-धर्माच्या अहंकारात ठेवले जाण्याची शक्कल पूर्वापार चालत आलेली आहे. एकाच वेलीवर एकाच ऋतूत जन्माला आलेली विविध जातीतील फुलांना जातिनिहाय वेगळे केले जात आहे.

संसर्ग माणसाचा झाला कसा ऋतूंना ?
आली फुले कशी हो जातीनिहाय भाऊ
जात अंताची खरी जर बात करतो
मग लढाया का पुढे तू जात करतो

हजारो वर्षाच्या जातीयवादी, विषमतावादी समाजामध्ये विशेष आरक्षणाचा लाभ घेतलेल्या अभिजन समाजामुळे इतर समाजाचे सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, मानसिक, बौद्धिक इत्यादी शोषण झालेले आहे. यातून थोडीफार झिज भरून निघावी म्हणून राजर्शि शाहू महाराजांनी देशात आरक्षणाची सुरुवात केली. त्याचाच पुढे सविस्तर विस्तार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला. मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय म्हणजेच आजच्या मराठा समाजापासून ते मातंग समाजापर्यंत सर्वांना आरक्षणाची गरज असल्याने त्यांना ते मिळण्यासाठी संघर्ष केला. परंतु काही महाभागांनी मागासलेले असतानाही आरक्षणाला विरोध केलेला होता. आता परिस्थिती बदलली. आरक्षणाच्या हक्काने समाजाच्या सर्वच स्तरात परिवर्तन दिसून येवू लागले. आणि त्यातील मुख्य विषय हा आरक्षण ठरला तेव्हा आता सर्वच समाजाकडून आरक्षणाची मागणी होताना दिसते तेव्हा ष्कोणत्याच कळपात नाही एकटाच चालतो मी धर्म माझा जात माझी फक्त संविधान आहे. जे कधी आरक्षणाला भीक संबोधित होते

लागले रांगेत आता का बरे भत्यास तेही

आज पाटीदार, मराठा, ब्राह्मण, जाट इत्यादी सर्वांना आरक्षण हवे आहे. याला कारण मागासवर्गीय समाजाची डोळ्यात भरणारी प्रगती आहे. त्याच्या सामाजिक स्तरात कमालीची झालेली भरभराट आहे. यावर अनेक संशोधने करावीत आणि या सामाजिक परिवर्तनाचा शोध घ्यावा, असे हा बदल आहे. या बदलासाठी फक्त आरक्षण हा एकच भाग कारणीभूत आहे, असे म्हणणे योग्य होणार नाही. तर त्या पाठीमागे जो विचार आहे. तो विचार समजून घेण्याची गरज आहे असे दिसून येते.

´ चाकरी आम्हा नको अन् भीकही आम्हा नको
न्याय हक्काचा शिरावर ताज आम्ही मागतो
भोवती धर्मांधतेचा कहर क्रूर होता,
धम्मधारी पावलांचा विनय पाहिला मीश्श

भगवान बुद्धांची मानवतावादी मूल्ये आणि डॉ. बाबासाहेबांचा क्रांतिसन्मुख विचार हाच खऱ्या अर्थाने मागासलेल्या समाजाच्या उत्थानाचा केंद्रबिंदू आहे. या बाबींकडे आरक्षण मागणाऱ्या समाजाने दुर्लक्ष करून चालणार नाही. या सर्व विचाराला आत्मसात केल्यामुळेच या समाजाची प्रगती होणे शक्य झालेले आहे. १९५० पासून संविधानिक भारत म्हणून एक नवी ओळख निर्माण झाली. आधीची मनूशाही, ठोकशाही, पेशवाई, राजेशाहीतील हुकूमशाही जावून लोकशाही आली. लोकशाहीच्या भवितव्याची जबाबदारी आपण भारतीय लोक म्हणून स्वीकारली. सर्वांना समान दर्जाची समान संधी प्राप्त व्हावी, राजकिय लोकशाहीतून सामाजिक लोकशाही प्रस्थापित व्हावी. जाती-धर्म विरहित एक

धर्मनिरपेक्ष भारत निर्माण व्हावा, ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धारणा होती. पण प्रत्यक्षात लोकशाहीतील लोकांच्या मनोभूमिकेमध्ये परिवर्तन झाले नाही तर मात्र हे सर्व कुचकामी ठरेल, असा धोका ही त्यांनी नोंदवून ठेवला होता.

मातीत जगतो मी, मातीत राब राबुन, माझ्याच जीवनाचा होतो कसा उकंडा
´ राहू दे तुझ्याकडेच त्या हिटलरची मूर्ख तत्वे, बुद्धाची होती ती लोकशाही मागतो आम्ही

मातीत राबणाऱ्या शेतकऱ्यांना अस्मानी संकट जसे छळते तसेच सुलतानी संकटही छळत असेल तर शेतकऱ्यांच्या जीवनाचा उकंडा होणे निश्चित आहे. तेव्हा मानवतेचे शासन म्हणून ज्या लोकशाहीचा एवढ्या मोठ्याप्रमाणात उदो उदो करण्यात येतो, त्या लोकशाहीला दोश दिला जातो. तसे पाहिले तर हा दोश लोकशाहीचा नसून, ती राबवणाऱ्या माणसांचा आहे. ती राबवणारी माणसे चांगल्या विचारांची असतील तर ते राज्य चांगल्या मूल्यांवर चालेल. 'निरपेक्ष लोकशाही देऊन भारताला पाया समानतेचा रचनास भीमराया डॉ. आंबेडकर हे एक नाव नसून, तो आता एक विचार झाला आहे. आणि डॉ. बाबासाहेबांचे नाव कोण्या विशिष्ट जातीचे वा धर्माचे नाही. तर ते एक वैश्विक विचारवंत आहेत. ते महापुरूष आहेत. आणि महापुरूष हा सर्वांचा असतो. नाव घेऊन फक्त चालत नाही. त्यांचे विचारही आचारात आणणे तितकेच महत्वाचे असते. त्यामुळे जातीने वा धर्माने बाबासाहेबांचे स्वत:ला समजणाऱ्या महाभागांचीही गझलेतून कानउघाडणी केलेली दिसते.ष्मुक्त केले काल ज्यांना गीत गाण्या क्रांतिचे का गुलामी सापळ्याचे लोक झाले सोबती बाबा तुझी कमाई लोभात हारणारे ते कालचे जुवारी होते तसेच दिसती आंबेडकरी विचार नास्तिक विचार नाहीत तर श्रद्धापूर्वक आस्तिक विचार आहेत. पण ही श्रद्धा डोळस आहे. परंपरेने, रूढीने चालत आलेल्या गोष्टी जशाच्या तशा स्वीकारीत नाही. आपल्या विवेकाच्या कसोटीवर वैज्ञानिक दृष्टिकोनातून पडताळून पाहिल्या जातात. माणसाचे कल्याण, माणसाची समृद्धी हा या विचाराचा केंद्रबिंद आहे. मूर्ती पूजा कोणाची? आणि कशाची? अशी चिकित्सा करण्याचे स्वातंत्र्य या विचाराने दिले आहे. म्हणून गौरवकुमार आठवले म्हणतात

पांगळ्यांना मानतो मी देव माझा, व्यर्थ पाशाणास ओवाळीत नाही
चालणाऱ्यांना दिला मी हात माझा, पाय त्यांचे मी कधी ओढीत नाही

जीवन जगताना सकारात्मक विचारांची फार गरज असते. म्हणून आपल्या आदर्शाच्या व्यक्तिमत्वातून आपल्याला सकारात्मकतेची प्रेरणा मिळत असते. तीच प्रेरणा घेवून कवी येथे व्यक्त होतो आहे. डॉ. बाबासाहेबांनी पुराणातील आदशांना नाकारून सिद्धार्थ गौतमाच्या नैतिकतेच्या आदर्शाचा स्वीकार केला. ज्यांनी चार्तुवर्ण्य व्यवस्था नाकारली. यक्षपूजा कर्मकांड असून, ती चुकीचा आदर्श समाजासमोर ठेवते आहे. म्हणून त्यांनी प्राणी हिंसा, दुसऱ्याची वस्तू हिसकावून घेणे, चारित्र्य संपन्न जीवन जगणे, मिथ्या वचन न करणे, मानवाचे मानसिक संतुलन बिघडवणारे नशापान न करणे अशा पंचशीलाच्या मार्गाला आदर्श समाजाच्या निर्मितीसाठी योग्य ठरवले होते. यामध्ये कोणतेही कर्मकांड वा चमत्कारादी प्रकार नसून, पूर्णतरू लौकिक आणि वास्तववादी विचारातून माणसाच्या जीवनामध्ये सुखाची प्राप्ती होवू शकते.

हा देह जरी तृष्णेच्या ज्वालांनी व्याकुळ झाला बुद्धाच्या उपदेशाने तृष्णेला विझवत असतो. ज्यांच्या मुखी भीम ज्यांच्या मनी बुद्ध त्यांच्या उरी काळ घेतोय आकार आंबेडकरवादी गझल मराठी गझलसृष्टीला नवा विचार देणारी गझल आहे. चळवळीचा बाज, इहवादी जीवनाचा साज आणि बुद्धिप्रामाण्यवादी आणि विज्ञानवादी आगाज असणारी गझल आहे..

सत्यास वर्तनारा ठरतो विचार द्रोही
धोक्यात लोकशाही... शंकाच उगीच नाही

वास्तवात निर्माण झालेल्या परिस्थितीवर भाष्य करताना कवी म्हणतात अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी होत आहे. देशभक्तीचे स्वरूप बदलते आहे. सोईच्या विचारांना राष्ट्रवादी आणि विरोधी विचारांना राष्ट्रद्रोही ठरविले जात आहे. अशा वातावरणात लोकशाही धोक्यात आल्याची शंका उगीच येत नाही तर जाहली ही लोकशाही बघ कशी घायाळ मित्रा पेशवाईचाच आला तर नव्हे हा काळ मित्रा हा विचार इतर जाणिवांपेक्षा दाहक आहे. समाज आणि देश हिताचा आहे. आता देशसेवा करावयाची असेल तर एकमेव मार्ग शिल्लक राहिलेला आहे आणि तो म्हणजे लोकशाही टिकवण्याचा तिचे संरक्षण करण्याचा. आंबेडकरी विचार, वादा करिता बाद म्हणून कधीच येत नाही तर सर्वसामान्यांच्या यातनांचा गोषवारा घेवून येतो. भोगलेल्या यातनांचा गोषवारा सर्व हा व्यर्थ नाही मांडिला वादाकरीता वाद मी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार क्षेतून वंचित असे कुठलेही क्षेत्र नाही. सामाजिक, धार्मिक, आर्थिक, स्त्रीमुक्ती, सांस्कृतिक, जल, जमीन इत्यादी संबंधी त्यांनी मौलिक विचार व्यक्त केलेले आहेत. ते आजच्या परिप्रेक्ष्यातही तंतोतंत लागू पडणारे आहे. ही डॉ. बाबासाहेबांच्या विचारांची कालातितता आहे. मराठी गझलेमध्ये आद्य आंबेडकरी गझलेचीही उपेक्षाच झालेली आहे. त्याचे कारण कदाचित मुसलसल गझल म्हणून ती दुर्लक्षित राहिली असावी, असा तर्क करता येतो. परंतु सुरेश भटानंतरच्या मराठी गझलेमध्ये आंबेडकरवादी गझल गैरमुसलसल अशी अस्सल आकृतीबंधासह आशय आणि अभिव्यक्तीच्या अंगाने मराठीचे गझलक्षेत्र समृद्ध करणारी ठरली आहे. तिची संवादी भाषाशैली, प्रतिमा, प्रतिकांचे वेगळेपण लक्ष वेधून घेणारे ठरले आहे.

राख झाल्या झोपड्यांची राख सांभाळून येथे
न्याय समतेचे मनोरे बांधते माझी गझल

### संदर्भ


1. *सांगोलेकर डॉ. अविनाश, गझलचिंतन, सायन पब्लिकेशन्स,पुणे, प्र.आ. २०१७, प१४३*
2. *मनोहर डॉ.सर्जनादित्य, आंबेडकरवादी गझलेतील नक्षत्रमुद्रा, आंबेडकरवादी गझलवेध, संपादक, प्रमोद वाळके/शरज शेजवळ, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, प्र.आ. २०१८, पृ.१६३*
3. *सांगोलेकर डॉ. अविनाश, गझलचिंतन, सायन पब्लिकेषन्स, पुणे, प्र.आ. २०१७, प९१५१*
4. *काळे डॉ. अक्षयकुमार, सुरेश भटांची गझल एक संवाद, अन् उदेला एक तारा वेगळा, संपा. डॉ. राम पंडित बांधण प्रतिष्ठन मुंबई.प्र.आ. २०११, प९३००*
5. *मनोहर यशवंत, आंबेडकरवादी गझलेचे सौंदर्यशास्त्र, आंबेडकर वादी गझलवेध, संपादक, प्रमोद वाळके*